विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

# दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ बुधवार दि. ५ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१९८ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


**सुविचार**

यदि आपके सहयोगी अपना विचार बदल लें तो ध्यान रखें कि कहीं इससे आपकी अपनी मनोदशा भी न बदल जाये।

# सरकार कसे स्थापन करणार? नरेंद्र मोदींनी दिले स्पष्ट संकेत



नवी दिल्ली,४- 'आम्ही पूर्ण मेहनतीने काम केलं आहे. २०२४ मध्ये गॅरंटी घेऊन लोकांमध्ये मतदानासाठी देशातील कोनाकोपऱ्यात गेलो होतो. आज तिसऱ्यांदा लोकांचा आशिर्वाद मिळाला आहे, मी त्यासाठी जनतेसमोर नतमस्तक आहे. सहकाऱ्यांनो, आजची ही वेळ माझ्यासाठी भावुक क्षण आहे. माझी आई गेल्यानंतर ही माझी पहिली निवडणूक होती, देशातील कोटी मातांनी मला आईची कमी जाणवू दिली नाही. मी जेव्हा लोकांमध्ये गेलो, तेव्हा मला आशिर्वाद दिला, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली भावना व्यक्त केली. येणाऱ्या काळामध्ये आम्ही आणखी चांगले काम करू, राष्ट्रासाठी आम्ही पुढे गेले पाहिजे अशी वेळ आहे. विकसित राष्ट्रासाठी चांगले निर्णय घेण्याची वेळ आली आहे, एनडीएला जनतेने कौल दिला आहे, हे नातं कायम टिकवणार आहे, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी सरकार स्थापन करणार असे संकेत दिले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालामध्ये भाजपला बहुमताने हुलकावणी दिली आहे. त्यानंतर आता सरकार कसे स्थापन करणार अशी चर्चा रंगली आहे. त्यानंतर दिल्लीत भाजपच्या मुख्यालयामध्ये पंतप्रधान मोदी यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि एनडीए सरकार स्थापन करणार असे स्पष्ट संकेत दिले आहे.

'आजचा हा विजय जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा विजय आहे. हे भारताच्या संविधानावर निष्ठेचा विजय आहे. हा विकसित भारताचा विजय आहे. सब की साथ सब का विकासाचा विजय आहे. १४० कोटी भारतीय लोकांचा विजय आहे. देशाच्या निवडणूक आयोगाचा मी आभारी आहे. जगातली सर्वात मोठी निवडणूक आयोगाने व्यवस्थिती हाताळली आहे. प्रचंड उन्हामध्ये लोकांनी मतदान केलं. आपल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी परिचय दिला. भारताची निवडणूक प्रक्रिया आणि व्यवस्थेवर भारतीयांना गर्व आहे. या सारखं कुठेही उदाहरण नाही. यावेळी भारतात ज्या लोकांनी मतदान केले, ते एखाद्या लोकशाही मानणाऱ्या लोकांच्या (पान २ वर)

## कुठलेच अपयश अंतिम नसते... -अजित पवार

मुंबई,४- राज्यातील राजकीय गोंधळाच्या परिस्थितीत महाराष्ट्राच्या जनतेने महाविकास आघाडीला कौल दिला आहे. राज्यातील लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालामध्ये महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी चांगली कामगिरी केल्याचं पहायला मिळतंय. तर महायुतीचा मोठा धक्का बसल्याचं पहायला मिळतंय. सर्वात मोठा सेटबॅक बसला तो राष्ट्रवादी अजित पवार गटाला... अजित पवार गटाने ५ जागेवर निवडणूक लढवली होती. त्यात फक्त रायगडच्या जागेवर त्यांना विजय मिळवता आलाय. त्यामुळे आता निराशाजनक कामगिरीनंतर अजित पवार यांनी पोस्ट करत पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवार काय म्हणाले? लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर (पान २ वर)

## संविधान वाचण्यासाठी संपूर्ण जनता एकत्र आली

नवी दिल्ली - लोकसभा निवडणूक निकालांचा सध्याचा कल पाहता इंडिया आघाडीनं जोरदार मुसंडी मारल्याचं चित्र दिसतंय. अनेक राज्यात इंडिया आघाडीने भाजपला टक्कर दिली अन् विजय मिळवला आहे. सध्या आलेल्या कल आणि निकालानुसार सत्ताधारी एनडीएला ३०० च्या आत जागा मिळतील आणि भाजपला स्वबळावर सत्ता मिळणार नाही, असं चित्र सध्या तरी दिसतंय. सत्ताधारी एनडीएला २९६ जागांवर आघाडीवर आहे. तर इंडिया आघाडीला जवळपास २२८ जागांवर आघाडी मिळतेय. अशातच आता राहुल गांधी यांचं सध्या कौतूक होताना दिसतंय. त्यातच आता निवडणूक निकालानंतर राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेतली.

आम्ही फक्त भाजपविरुद्ध लढलो नाही तर स्वतंत्र संस्थाविरोधी देखील लढलो, आम्ही संविधान वाचवण्यासाठी लढतो. संविधान वाचण्यासाठी



संपूर्ण जनता एकत्र आली. भाजपकडून फोडाफोडीचं राजकारण केलं पण आम्ही एकत्र लढलो. मोदी आणि शहा यांनी यंत्रणांचा गैरवापर केला पण इंडिया आघाडीने देशाला नवा दृष्टीकोन दिलाय. मोदींचा पराभव म्हणजे अदानींचा पराभव. लोकशाही वाचवण्याचं काम देशातील सर्वात गरिब लोकांनी केलं आहे. लोकांनी या निकालामधून मोदी आणि शहा यांना संदेश दिला आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.


सरकार स्थापन करणार का? असा सवाल जेव्हा राहुल गांधी यांना विचारला गेला तेव्हा आम्ही मित्रपक्षांशी चर्चा करून घेऊ. उद्या इंडिया आघाडीची बैठक आहे. त्यात जो निर्णय होईल, तसा निर्णय आम्ही घेऊ, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अदानींचे शेअर तुम्ही पाहिले? जनता मोदींचा थेट संबंध अदानींशी समजत आहे.. जनतेनंच मोदींना नाकारलं आहे. आम्ही ते ज्या पद्धतीनं देश चालवत आहेत त्याचं समर्थन करत नाही हेच जनतेनं पंतप्रधानांना दाखवून दिलं आहे आणि मला या जनतेचा प्रचंड अभिमान वाटतोय, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. यावेळी राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशच्या जनतेचं आणि प्रियांका गांधी यांचं कौतूक केलं.

## अजित पवार गटाच्या उमेदवाराला फक्त २०१ मते

मुंबई,४ - लोकसभा निवडणुकीत अनेक धक्कादायक निकाल पाहायला मिळत आहेत. राज्यात महाविकास आघाडीचा मोठा विजय झाल्याचे दिसत आहे. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फ ूट पडल्यामुळे या दोन पक्षाच्या गटांत मोठी चुरस पाहायला मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाने महाराष्ट्रात चार ठिकाणी तर लक्षद्विपमध्ये एका ठिकाणी आपले उमेदवार उभे केले होते. त्यापैकी बारामती, शिरूर आणि लक्षद्विपमध्ये दोन्ही राष्ट्रवादीत थेट लढत होती. बारामती आणि शिरूरमध्ये शरद पवार गटाच्या उमेदवारांचा विजय झाला तर लक्षद्विपमध्ये दोन्ही गटाच्या उमेदवारांचा पराभव झाला आहे.

## नितीन गडकरींना पंतप्रधान करा..



नागपूर,४ - लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होताच देशाच्या राजकारणालाच कलाटणी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ' चारसो पार'ची घोषणा देणाऱ्या भाजपला निकालाने धक्का दिला आहे. त्यामुळे आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरच प्रश्न उपस्थित केले जात आहे. त्याची प्रचिती मंगळवारी भाजप नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानापुढे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांमुळे आली.

नागपूर लोकसभा म तदारसंघातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तिसऱ्यांदा विजयी झाले. या निवडणुकीच्या निकालाकडे देशाचे लक्ष लागले होते. गडकरी यांच्या विजयाची घोषणा होताच मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्त्यांनी गडकरी यांच्या निवासस्थानापुढे जल्लोष केला. यावेळी अनेक कार्यकर्त्यांच्या हाती गडकरी यांना पंतप्रधान करा, अशा आशयाचे फलक होते. त्यावर ' देशाचे पंतप्रधान नितीन गडकरी साहेब हो ही देवाकडे प्रार्थना' असे लिहिले होते. हा फलक सर्वाचे लक्ष वेधून घेणारा होता. गडकरींच्या विजयाचा आनंद साजरा करतानाच त्यांना पंतप्रधानपदी पाहण्याची इच्छा कार्यकर्त्यांची आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडले. मिठाई वाटण्यात आली. कार्यकर्त्यांच्या जल्लोषात खुद्द गडकरी सहभागी झाले होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे भाजपचे वरिष्ठ नेते असून त्यांचे नाव यापूर्वीही भाजपची सत्ता आल्यावर पंतप्रधानपदासाठी घेतले जात होते. आता त्यांना संधी आहे, अशी भावना कार्यकर्त्यांची आहे. त्यामुळेच त्यांनी फलकाच्या माध्यमातून व्यक्त केल्याचे सांगितले जाते.

दरम्यान निकालाच्या दिवशीच पंतप्रधानपदासाठी गडकरी यांचे नाव कार्यकर्त्यांनी पुढे केल्याने याची राजकीय वर्तुळातही चर्चा (पान २ वर)

## ८८ गंभीर गुन्हे तरीहि चार लाखांच्या मताधिक्यांनी विजय

केरळ,४ - लोकसभा निवडणुकीचे निकाल जवळपास स्पष्ट होत आले आहेत. काही ठिकाणी मतमोजणीची शेवटची फेऱ्या सुरू आहेत. देशात इंडिया आघाडी २२९ जागांवर आघाडीवर आहे. तर एनडीएप्रणित भारतीय जनता पार्टी २९६ जागांवर आघाडीवर आहे. थोड्या वेळात सर्व निकाल स्पष्ट होतील. आता केरळ राज्यातील इडुक्की मतदारसंघातून काँग्रेसचे डीन कुरियाकोस यांनी मोठ्या मताधिक्यांनी विजय मिळवला आहे. केरळमधील इडुक्की मतदारसंघाच्या या लढतीकडे संपूर्ण केरळचं लक्ष लागले होते.

(पान २ वर)

## गांधीनगरमधून अमित शाह यांचा बंपर विजय, ७ लाख मताधिक्याने हरवले

गांधीनगर: देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा लोकसभा निवडणूक २०२४मध्ये प्रचंड बहुमताने विजय झाला आहे. अमित शाह यांनी गांधीनगरल लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला आहे.

निवडणुकीचे यंदाचे निकाल भले भाजपा आणि एनडीएनुसार राहिलेले नाहीत. मात्र गुजरातच्या गांधीनगर मतदारसंघातून अमित शाह यांनी कमाल केली आहे. या जागेवरून अमित शाह यांनी आपलाच जुना रेकॉर्ड मोडीत काढत ७,४४७,१६ मतांनी विजय मिळवला आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत अमित शाह यांनी या जागेवरून ५ लाख मतांनी



विजय मिळवला होता. याआधी गांधीनगर मतदारसंघातून अडवाणी यांनी ४.८३ लाख मतांनी विजय मिळवला होता. गेल्या ३५ वर्षांपासून गांधीनगर मतदारसंघ भाजपच्या ताब्यात आहे. अमित शाह यांच्याआधी या जागेवरून लालकृष्ण अडवाणी निवडणूक लढवत होते. त्यामुळे ही जागा भाजपसाठी अतिशय सुरक्षित मानली जात होती.

## प्रभू श्रीरामाच्या प्रांगणातच भाजपचा दारुण पराभव

फैजाबाद,४- उत्तर प्रदेशातील फैजाबाद लोकसभा मतदारसंघात भाजप दारुण पराभवाच्या छायेत आहे. फैजाबाद मतदारसंघात अयोध्या येते, येथेच भाजपला पराभवाचा सामना करावा लागतोय. ५०० वर्षानंतर प्रभू रामाची प्राणप्रतिष्ठा झाली होती. प्रचारात हा मुद्दा गाजला होता. पण अयोध्यामध्येच भाजपला पराभाचा सामना करावा लागत असल्यामुळे सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरु आहे.

रामाच्या भूमीत भाजपला पराभवाचा झटका बसण्याची शक्यता आहे. फैजाबाद लोकसभा मतदार संघात समाजवादी पक्षाचा विजय जवळपास निश्चित झालाय. भाजपचे अनेक (पान २ वर)

## जनतेचे आभार- विजयी उमेदवारांचे अभिनंदन

लातूर (प्रतिनिधी) : लातूर लोकसभा मतदारसंघातून विजयी झालेले महाविकास आघाडी, काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचे मन:पुर्वक अभिनंदन. महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी, समाजवादी पार्टी व इतर मित्रपक्षांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परीश्रमाचा हा विजय असून या सर्वांचे तसेच मतदार संघातील जनतेचे मन:पुर्वक आभार मानत असल्याची प्रतिक्रीया माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे.



लोकसभा निकालावर प्रतिक्रीया व्यक्त करताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे की, लातूर सह मराठवाडा, महाराष्ट्र आणि संपूर्ण देशातील जनतेने निर्भय बनून महाविकास आघाडीस (इंडिया आघाडी) पाठींबा दिल्यामुळे ऐतिहासिक विजय मिळाला आहे. या विजयासाठी काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, अ.भा. काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, पक्षाचे नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांनी प्रचंड परीश्रम घेतले आहेत. या सर्वांचे मन:पुर्वक आभार.

## वायनाडमध्ये विजय, रायबरेलीतही डंका! दोन्ही जागांवर राहुल गांधींचा लाखो मतांच्या फरकाने विजय

नवी दिल्ली,४ - लोकसभा निवडणुकीचा निकाल स्पष्ट झाला आहे. भाजपला महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश यासारख्या महत्त्वाच्या राज्यांत अनपेक्षित धक्का बसला आहे.भाजपच्या अनेक दिग्गज नेत्यांचा धक्कादायक पराभव झाला आहे. तर दुसरीकडे काँग्रेसने यावेळी दमदार कामगिरी केली करत अनेक जागांवर मोठ्या फरकाने विजय मिळवला आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा खासदार राहुल यांनीही यावेळी नेत्रदीपक कामगिरी केली असून वायनाड आणि रायबरेली या दोन्ही जागांवर तीन लाखांपेक्षा अधिक मतांच्या फरकांनी विजय मिळवला.

वायनाडमध्ये राहुल गांधींना किती मते?

राहुल गांधी यांनी २०१९ साली केरळमधील वायनाड या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. तेव्हा त्यांचा मोठ्या मतांच्या फरकाने विजय मिळवला होता. यावेळीदेखील राहुल गांधी यांनी याच काम गिरीची पुनरावृत्ती केली आहे. राहुल गांधी यांना या जागेवर आतापर्यंत ६ लाख ४७ हजार ४४५ मतं पडली आहेत. या जागेवर कम्यूनिष्ट पार्टी ऑफ इंडियाच्या उमेदवार ॲनी राजा या दुसऱ्या क्रमांकावर आहेत. त्यांना आतापर्यंत २ लाख ८३ हजार २३ मतं मिळाली आहेत. भारतीय जनता पार्टीचे के सुरेंद्रन हे तिसऱ्या स्थानी आहेत. त्यांना १ लाख ४१ हजार ४५ हजार मतं मिळाली आहेत. म्हणजेच राहुल गांधी आणि द्वितीय क्रम ांकाचा नेता यामध्ये एकूण ३ लाख ६४ हजार ४२२ मतांचा फरक आहे. मतांचा हा फरक भरून निघणारा नाही. त्यामुळे आता राहुल गांधी येथून विजयी झाल्याचे गृहित धरले जात आहे.

रायबरेलीमध्ये नेमकी काय स्थिती?

रायबरेली म तदारसंघातूनदेखील राहुल गांधी हेच आघाडीवर आहेत. सध्या त्यांना ६ लाख ८४ हजार ५९८ मते पडली आहेत. या जागेवर भारतीय जनता पार्टीचे दिनेश सिंह हे दुसऱ्या क्रमांकावर आहेत. त्यांना आतापर्यंत अवघी २ लाख ९५ हजार ८५६ मते पडली आहेत. म्हणजेच राहुल गांधी हे सध्या ३ लाख ८८ हजार ७४२ मतांनी आघाडीवर आहेत. भाजपच्या उमेदवराला मतांचा (पान २ वर)

## २४३ गुन्हे दाखल असलेल्या भाजपा उमेदवाराला जनतेने नाकारले

मुंबई,४ -लोकसभा निवडणुकांसाठी मतमोजणी आज पार पडली. काही ठिकाणी मतमोजणी पूर्ण झाली असून काही ठिकाणी अद्याप मतमोजणी सुरू आहे. आतापर्यतच्या निकालानुसार, एनडीएला २९२ जागांवर विजय मिळाला आहे, तर इंडिया आघाडीला २३२ जागा व इतरांना १९ जागा मिळाल्या आहेत. आज जाहीर झालेल्या निकालात अनेक प्रस्थापितांना धक्का बसला आहे. हा निकाल बऱ्याच बाबतीत अनपेक्षित राहिला. यावेळी गंभीर गुन्हे दाखल असलेल्या काही उमेदवारांना मतदारांनी नाकारले आहे.

## लातूर लोकसभा मतदार संघातून डॉ.शिवाजी काळगे विजयी





**लातूर / प्रतिनिधी-** लातूर लोकसभा मतदारसंघात भाजपला काँग्रेसने मोठा धक्का दिला आहे. अगदी अटीतटीच्या झालेल्या निवडणुकीचा निकाल मंगळवारी घोषीत करण्यात आला. यात काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी ६१ हजार ८८१ मते मिळवत भाजपचे सुधाकर श्रृंगारे यांचा पराभव केला आहे. डॉ. काळगे यांना ६ लाख ९ हजार २१ तर श्रृंगारे यांना ५ लाख ४७ हजार १४० मते मिळाली. 'वंचित'चे नरसिंग उदगीरकर यांच्या पारड्यात ४२ हजार २२५ मते पडली.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत लातूर मतदारसंघात भाजपचा विजय झाला होता. भाजपचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांनी काँग्रेसचे त्यावेळचे उमेदवार मच्छिंद्र कामत यांचा मोठ्या फरकाने पराभव केला होता. त्यावेळी श्रृंगारे यांना ६ लाख ६१ हजार ४९५ मते मिळाली होती, तर कामत यांना ३ लाख ७२ हजार ३८४ मते मिळाली होती. वंचित बहुजन आघाडीचे राम गारकर यांना १ लाख १२ हजार २५५ मते मिळाली होती.

यावेळी काँग्रेसने या लोकसभा मतदारसंघाची मजबूत बांधणी केली होती. मराठवाड्यातील काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील - चाकूरकर यांच्या स्नुषा डॉ. अर्चनाताई पाटील - चाकूरकर यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यानंतर काँग्रेसचे आमदार, स्थानिक प्रतिनिधींनी या मतदारसंघात जोरदार मोर्चेबांधणी केली होती. लातूर लोकसभेची निवडणूक काँग्रेससाठी अस्तित्वाची तर भाजपसाठी प्रतिष्ठेची होती.

या मतदारसंघात काँग्रेसकडून डॉ. काळगे, भाजपकडून दुसऱ्यांदा श्रृंगारे तर वंचित बहुजन आघाडीकडून नरसिंग उदगीरकर यांना उमेदवारी देण्यात आली होती. गेल्या दोन वेळा पराभवाचे तोंड पहावयास लागल्याने यावेळी देशमुख परिवाराने ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याचे दिसून आले, तर गत वेळी ३ लाखांचे मताधिक्य मिळविलेल्या भाजपचे श्रृंगारे यांच्यासमोर तो आकडा टिकवण्याचे आव्हान होते. काँग्रेसच्या विजयासाठी अख्खे देशमुख कुटुंबिय प्रचाराच्या मैदानात उतरले होते. भाजपचे आमदार व स्थानिक नेत्यांनीही प्रचारात आघाडी घेतली होती. मंगळवारी सकाळी ८ वाजेपासून मतमोजणी प्रक्रियेस सुरूवात झाली. पहिल्या फेरीपासून डॉ. काळगे हे मतांमध्ये आघाडीवर होते. शेवटी डॉ. काळगे यांचा ६१ हजार ८८१ मताधिक्याने विजय जाहीर करण्यात आला. एकूण मतांची बेरीज १२ लाख ४० हजार ६१४ एवढी आहे. या निवडणुकीत 'नोटा'ला १ हजार ५३५ एवढी मते मिळाली.

## महिलांचा सन्मान करणारी संस्कृतीच जगात सर्वश्रेष्ठ



लातूर / प्रतिनिधी- येणारा काळ मातृशक्तीचा आहे, ज्या देशात महिलांना देवीच्या, आईच्या रुपात पाहिले जाते, महिलांचा सन्मान होतो त्याच देशाची संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ ठरते. आईनेच अनेकांना घडवले, रामेश्वर गाव आदर्श होण्यामागे मातृशक्ती आहे तेव्हा मातृप्रधान संस्कृती टिकली पाहीजे. त्यागमुर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या पंचकन्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे असे प्रतिपादन संत वृत्तीचे थोर शास्त्रज्ञ जगप्रसिध्द संगणक तज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे यांच्या वतीने लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रुई) येथे त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड यांच्या आकराव्या पुण्यस्मरण स्मृतिदिनाचे औचित्य साधून पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा, संत गोपाळबुवा महाराज पुनर्निर्माण मंदिराचा (पान २ वर)

# विश्वेश्वरय्याच्या विश्वेश्वर स्क्रिनींग टेस्ट २०२४ ला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

औसा (प्रतिनिधी) : तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयात इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्याकरिता १० वी नंतर पुढे काय या विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या समोरील प्रश्नाकरिता विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाने १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बुध्दीमत्ता, सामान्य ज्ञान, इंग्रजी व दहावीच्या अभ्यासक्रमावर आधारित स्क्रिनींग टेस्ट २०२४ चे आयोजन करून विश्वेश्वर शैक्षणिक संकुलात ऑनलाईन तसेच ऑफलाईन पध्दतीच्या माध्यमातुन परिक्षा घेण्यात आली या विश्वेश्वर स्क्रिनींग टेस्टसाठी मराठवाडयासह लातूर जिल्हा व परिसरातून १२०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या स्क्रिनींग टेस्टसाठी नावनोंदणी केली होती.





०२ जुन रोजी विश्वेश्वर संकुलात येऊन ७४० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन २३० तर ५१० ऑफलाईन पध्दतीने परिक्षा दिली. या परिक्षेदरम्यान महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांच्या माध्यमातुन १० वी नंतर पॉलिटेक्निक डिप्लोमा, ११ वी सायन्स, ११ वी कॉमर्स व आय.टी.आय. च्या प्रवेशासंदर्भात सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना १० वी नंतर पुढे काय? या विद्यार्थ्यांना व पालकांना पडलेल्या प्रश्नाचे उत्तर म्हणुन १० वी नंतर असलेल्या शैक्षणिक संधी व त्यामधुन मिळणाऐया नोकऐया या बाबतीतही पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. या स्क्रिनींग टेस्टसाठी आलेल्या विद्यार्थ्यांचा ओढा पाहुन पॉलिटेक्निक डिप्लोमा करण्यासाठी विद्यार्थ्यांचा कल दिसुन येत होता. परिक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निक डिप्लोमा प्रवेशासंदर्भात महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व पॉलिटेक्निक प्रवेशासंदर्भात राबविण्यात येणाऐया प्रक्रियेसंबंधी माहिती देऊन शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऐया विविध ईबीसी, स्कॉलरशिप, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता, बांधकाम मजुर शिष्यवृत्ती याबाबतीतही सखोल माहिती देऊन अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी व करिअर याचेही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाच्या सुविधा केंद्रास भेट देऊन आपली नाव नोंदणी करून घ्यावी असे आवाहन प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी केले.

ही विश्वेश्वर स्क्रिनींग टेस्ट २०२४ यशस्वी करण्यासाठी संस्थेच्ये सचिव बसवराज धाराशिवे व सहसचिव महादेव खिचडे यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, विश्वेश्वरय्या औद्योगिक संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यु बर्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर, विभागप्रमुख रेवणसिध्द बुक्का, प्रविण साबदे, मंगेश बिडवे, संदेश माडे, अब्दुल समद काझी, अजित लोकरे, चंद्रशेखर चरकपल्ले, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.



# अंकुलगा (राणी) येथील भूमिपुत्राच्या विजयाचा जल्लोष, गावभर वाटले पेढे

शिरूर अनंतपाळ : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अंकुलगा (राणी ) गावचे भूमिपुत्र डॉ. शिवाजी बंडप्पा काळगे यांचा लातूर लोकसभा निवडणुकीत सोशल मिडियावर विजय झाल्याची बातमी त्यांचे जन्मगाव असलेल्या अंकुलगा (राणी ) येथे समजताच गावकऱ्यांनी गावात फटाके फोडून एकमेकांना पेढे वाटत विजयोत्सव साजरा केला.

शिरूर अनंतपाळ तालुक्याला प्रथमच लोकसभेची उमेदवारी मिळाली आणि अंकुलगा राणी गावचे भाग्य उदयास आले. अभिमानाची बाब म्हणजे डॉक्टर शिवाजी काळगे याचा विजय झाला . गावासाठी नेहमीच कर्तव्यशिल असलेले काळगे विजयी झाल्याने गावात आनंदाचे वातावरण पसरले असून, आपल्या गावाचे नाव डा. शिवाजी काळगे यांच्या रूपाने दिल्लीत पोहचल्याचे शेतकरी संघटणचे माजी जिल्हाअध्यक्ष माधव मल्लेशे यांनी सांगितले. यावेळी गावातील लहानथोर नागरिकांनी बॅडपथक गावातील मंदिरावर समोर फटाके वाजवून मोठा जल्लोष साजरा करण्यात आला.

## पान १ वरून

### सरकार कसे...

पेक्षा जास्त आहे. जम्मू काश्मीरमध्ये निवडणुकीमध्ये म ोठ्या प्रमाणात लोकांनी मतदान केले असून जगातील लोकांसमोर आदर्श घालून दिला आहे. त्या लोकांनी आदरपूर्वक नमन करतो. सर्व उमेदवारांचे मी अभिनदन करतो. सगळ्यांची सहभागामुळे हा विजय शक्य नव्हता. प्रत्येक कार्यकर्त्याचा मी आभारी आहे, अशी भावना मोदींनी व्यक्त केली.

’या निवडणुकीमध्ये या जनादेशाचे अनेक पैलू आहे. १९६२ नंतर कोणतं तरी सरकार आपला कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर परत आलं आहे. राज्यामध्ये जिथे विधानसभा निवडणूक झाली तिथे एनडीएला भक्कम विजय मिळाला आहे. अरुणाचल प्रदेश असेल ओडीसा असेल किंवा सिक्कीम असेल तिथे भाजपचं राज्य आलं आहे. तिथे काँग्रेसचा सुपडा साफ झाला आहे. त्यांना डिपॉझिट वाचवणं सुद्धा कमी झालं आहे. भाजप ओडिसामध्ये सरकार स्थापन करणार आहे. सोबत लोकसभा निवडणुकीतही ओडिशाने चांगले काम केले आहे. हे पहिल्यांदाच घडलं आहे. हे पहिल्यांदाच घडलं जगन्नाथच्या धर्तीमध्ये भाजप सरकार स्थापन करत आहे. केरळमध्ये लोकांनी भरभरून मतदान केले आहे. तेलंगणामध्ये लोकांनी मतदान केले आहे, तिथे आपली संख्या डब्बल झाली आहे. गुजरात,छत्तीसगड, उत्तराखंड अनेक राज्यामध्ये आमच्या पक्षाने क्लिन स्वीप केले आहे. या राज्यामध्ये आंध्रप्रदेश, सिक्कीम आणि ओडिशांच्या लोकांचे मी आभार मानतो. केंद्र सरकार तुम च्या विकासासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. आंध्रामध्ये चंद्रबाबू नायडू यांच्या नेतृत्वामध्ये चांगले काम केले आहे. नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली एनडीएने चांगले काम केले आहे’ असेही मोदी म्हणाले.

आम्ही पूर्ण मेहनतीने काम केले आहे. २०२४ मध्ये गॅरंटी घेऊन लोकांमध्ये मतदानासाठी देशातील कोनाकोपऱ्यात गेलो होतो. आज तिसऱ्यांदा लोकांचा आशिर्वाद मिळाला आहे, मी त्यासाठी जनतेसमोर नतमस्तक आहे. सहकाऱ्यांनो, आजची ही वेळ म ाझ्यासाठी भावुक क्षण आहे. माझी आई गेल्यानंतर ही माझी पहिली निवडणूक होती, देशातील कोटी मातांना मला आईची कमी जाणवू दिली नाही. मी जेव्हा लोकांमध्ये गेलो, तेव्हा मला आशिर्वाद दिला. हे मी आकड्यांमध्ये पाहू शकत नाही. महिलांनी मोठ्या संख्येनं मतदान केलं आणि रेकॉर्ड केलं. देशातील कोट्यवधी मातांनी मला आशिर्वाद दिला. देशाने खूप काही सहन हे आम्हाला काही करण्याची शक्ती निर्माण करते, आम्ही जगातील कल्याणकाही योजना चालवली आणि पुढेही आपल्याला राष्ट्रासाठी असंच काम करायचे आहे, असेही मोदी म्हणाले.

### कुठलेच...

झाले आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीला मतदान केलेल्या समस्त मतदार बंधु-भगिनींचे सर्वप्रथम मनापासून आभार म ानतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली ’एनडीए’नं बहुम ताचा टप्पा गाठला, त्याबद्दल प्रधानमंत्री महोदयांचं आणि ’एनडीए’च्या सर्व विजयी उमेदवारांचं अभिनंदन करतो. ’एनडीए’च्या विजयासाठी गेले काही महिने सातत्यानं परिश्रम घेतलेले सर्व नेते, कार्यकर्ते, हितचिंतक, मतदार बंधू-भगिनी सर्वांना धन्यवाद देतो, असं अजित पवार म्हणाले आहेत.

### नितीन...

सुरू झाली आहे. गडकरी यांचे सर्व पक्षातील नेत्यांचे उत्तम संबंध असून त्याची अनेकदा चर्चाही होते. अनेकदा याच चर्चेमुळे ते राजकीयदृष्ट्या अडचणीची ठरली आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाने गडकरी यांचे नाव या पदासाठी पुढे करावे, अशीही चर्चा निवडणूक निकालापूर्वीपासूनच सुरू झाली होती.त्याला आज कार्यकर्त्यांच्या मागणीमुळे पुन्हा तोंड फुटले आहे. गडकरी यांनी मात्र यावर अधिकृतरित्या काहीही काहीही प्रतिक्रिया दिली नाही.

### ८८ गंभीर...

केरळमधील इडुक्की लोकसभा निवडणुकीत काटे की टक्कर पाहायला मिळत होती. मात्र, शेवटच्या काही मतमोजणीच्या फ ेऱ्यात काँग्रेसचे उमेदवार डीन कुरियाकोस यांनी बाजी मारली. डीन कुरियाकोस यांनी तब्बल ४ लाख ३२ हजार ३७२ मते मिळवत मोठा विजय मिळवला आहे. डीन कुरियाकोस यांच्या विरोधात इडुक्की मतदारसंघातून सीपीआय एम पक्षाचे जॉयस जॉर्ज निवडणुकीच्या मैदानात होते. मात्र, त्यांना २ लाख ९८ हजार मत पडली. मात्र, डीन कुरियाकोस यांनी त्यांचा तब्बल २ लाख मतांनी पराभव केला.

### प्रभू श्रीरामाच्या...

वर्ष खासदार असलेले लल्लू सिंह यांना पराभवाचा सामना करावा लागतोय समाजवादी पक्षाचे अवधेश प्रसाद यांचा विजय झालाय.

समाजवादी पार्टीचे अवधेश प्रसाद यांना ५५०२०९ इतकी मते मिळाली आहेत. तर भाजपचे अनुभवी लल्लू सिंह यांना ४९४५०५ इतकी मते मिळाली आहे. सम ाजवादी पार्टीच्या अवधेश प्रसाद यांचा ५५७०४ मतांनी विजय झाला.

### वायनाडमध्ये....

हा फरक भरून काढणे शक्य नसल्याचे म्हटले जात आहे. म्हणूनच राहुल गांधी या जागेवरून विजयी झाले, असे गृहित धरले जात आहे.

### महिलांचा...

शुभारंभ, शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापणा, कलशारोहण सोहळा, त्यागमुर्ती प्रयागअक्का कराड समाधी मंदिराचे उद्घाटन आणि थोर स्वातंत्र्य सेनानी राष्ट्रधर्मपुजक दादाराव साधू कराड यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण सोमवार ३ जून रोजी मोठया उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. या सोहळयात प्रमुख पाहुणे म्हणून पद्मभूषण डॉ. विजय भटकर बोलत होते. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मुर्तीप्रतिष्ठापणा व कलशारोहण पुरोहीत मिलींद राहूरकर पुणे यांनी व त्यांच्या सहकार्यांनी मंत्रोपचारांनी केला. या सर्व कार्यक्रमात विविध गावचे भजनी मंडळ सहभागी झाले होते. यात महिला भजनी मंडळांचा मोठा सहभाग दिसून आला.

ज्ञानविज्ञान आणि अध्यात्माचा समन्वय साधून आयुष्यभर समाजप्रबोधन व सांप्रदायिक सद्भावनेचे सेवाभावी कार्य, समर्पित व निरपेक्ष भावनेने अव्याहतपणे करून, समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या अयोध्या येथील श्री रामायणम धाम आश्रमाच्या माध्यमातून समाजप्रबोधन व ज्ञान विज्ञान अध्यात्माचा प्रसार करणाऱ्या विदूषी दीदी मॉ. मंदाकिनी श्रीराम किंकर, मुंबई येथील ज्येष्ठ प्रवचनकार व कीर्तनकार ह.भ.प.सौ. भगवतीताई सातारकर-दांडेकर, नेपाळ येथील थोर समाजसेविका श्रीमती मीरा महार्जन आणि थोर निष्ठावंत वारकरी व कवयित्री श्रीमती विजयाबाई गोविंद कदम आणि पुण्यातील थोर समाजसेविका श्रीमती मेधा सुरेश घैसास या पंचकन्यांना पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, सुवर्णपदक व रोख एकवीस हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरुप होते. या कार्यक्रमास झारखंड राज्यातील सरला-बिर्ला विद्यापीठाचे कुलगूरु डॉ. गोपाल पाठक, ह.भ.प. हरीहर महाराज दिवेगावकर, ह.भ.प. तुळशीराम कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड, एटीडी विद्यापीठीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश कराड, लातूर एमआटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड, डॉ. हनुमंत कराड, प्रा. डॉ. सुचित्रा नागरे, प्रा. डॉ. सुनिल कराड, प्रा. स्वाती चाटे, आदिती कराड, संस्कृतचे गाढे अभ्यासक पं. वसंतराव गाडगीळ, कमल राजेखाँ पटेल, ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर, सुदाम महाराज पानेगावकर, उध्दव बापू आपेगावकर, रतनलाल सोनाग्रा, भंते तिसावरो, बालासाहेब कराड, राजेश कराड यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# कृषि विद्यापिठाचे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतावर:डॉ. बाबासाहेब ठोंबरे



लातूर - कृषि महाविद्यालयात ग्रामीण उद्योजकता जागरूकता विकास योजना अंतर्गत अभिविमुक्ता कार्यक्रम संपन्न. यामध्ये कोळपा, कासारखेड, महापूर, चिखलठाना, बोरवटी गावांचा समावेश असून या गावात एकूण ९८ विद्यार्थी कृषिदुत व कृशिकन्या म्हणून नियुक्त केले आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून चिखलठाण्याचे श्री. नंदकिशोर देशमुख, कासारखेड्याचे शेषकुमार माने तर महापूर चे संदीप माने हे प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. यावेळी डॉ. ठोंबरे यांनी कृषिदुत व कृषिकन्या यांना ग्रामीण भागात कृषि विद्यापिठाचे तंत्रज्ञान यशस्वीपणे प्रसारीत करण्यासाठी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले की, ग्रामीण संस्कृतीशी एकरूप होवून शेतकऱ्यांच्या अनुभवातून निर्माण झालेले तंत्रज्ञान आत्मसात करावे व शेतकऱ्यांचे निव्वळ उ्पन्न वृद्धीसाठी प्रामाणिक प्रयत्न करावे. याप्रसंगी श्री. संदीप माने म्हणाले की, माझ्या महापूर गावात कृषि विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा उत्पन्न वाढीसाठी फायदा झाला आहे. एकूणच ग्रामीण जीवनात सामाजिक व अर्थव्यवस्था उंचविण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे योगदान मोठे आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. विश्वनाथ कांबळे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर सुरडकर तर आभार प्रदर्शन डॉ. ज्योती देशमुख यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. अनंत शिंदे, डॉ. पद्माकर वाडीकर, डॉ. राजेश शेळके, डॉ. नितीन तांबोळी, डॉ. विनोद शिंदे, डॉ. सुनिता मगर, डॉ. प्रभाकर अडसूळ, डॉ. शिवशंकर पोले हे उपस्थित होते तर या कार्यक्रमास ९८ विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी यांनी उपस्थिती दर्शवली.

# शिवलिंगेश्वर फार्मसीत कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे ४० विद्यार्थ्यांची निवड

औसा: (प्रतिनिधी) फार्मसी मधील पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऐया विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळावी, या उद्देशाने आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी मधील ४० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंटची ऑफर मिळाली आहे. औषधनिर्माणशास्त्रातील नामांकित कंपन्यांनी नोकरीची संधी उपलब्ध करून दिल्याने आता या विद्यार्थ्याच्या करिअरला नवे वळण मिळणार आहे. या मोहिमेला संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात विविध महाविद्यालयातून सुमारे २१७ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती .

अ ौ ष ध नि र्मा ण शा स्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात दि. २ जून २०२४ वार रविवार रोजी घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सिरी एज्युटेक, कोल्हापुर या कंपनीकडून ४० विद्यार्थ्यांना प्लेसमेंटची संधी मिळाली आहे. प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, प्लेसमेंट सेलप्रमुख प्रा. युवराज काटु यांनी आमच्या महाविद्यालया बरोबरच इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही नोकरीच्या संधी उपलब्ध करून देऊन आमच्या संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. कॅम्पस प्लेसमेंट्सद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावसायिक भविष्याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करून विविध करिअर मार्ग निवडण्यास नक्कीच मदत करतील असे मत यावेळी प्राचार्यांनी व्यक्त केले. सिरी एज्युटेक, कोल्हापुर कंपनीचे सचिन कुंभोजे, व्यवस्थापकीय भागीदार, विश्वजीत काशीद, आयआयएम. टेडएक्स व अतंरराष्ट्रीय वक्ते आणि सागर कागवडे, रोचे डायग्नोस्टिक्स, निलोफर खान, एव्हर्सना, जोएल बर्डेकर, रोजगार सल्लागार, प्रमोद शिंदे, निऑन प्रयोगशाळा, यांनी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

# लिंगायत उमेदवार दिल्याचा लातूरात काँग्रेस पक्षाला फायदा झाला :प्रा सुदर्शनराव बिरादार

लातूर - या २०२४ घ्या लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने लिंगायत समाजातील डॉक्टर शिवाजी काळगे यांना उमेदवारी दिल्याने लाखोंच्या संख्येत असलेल्या लिंगायत समाजाने मनावर घेऊन पक्षाच्या नेत्यां , कार्यकर्त्यां प्रमाणे निवडणुकीत काम केले. प्रत्यक्ष डॉक्टर शिवाजी काळगे यांची भेट होवो कि न होवो.


त्यांच्या विनंतीची वाट न पहाता स्वतः उमेदवार असल्याचे समजुन लिंगायत समाज बांधवांनी काम केले.व आ.अमित देशमुख व परिवारातील सर्व मान्यवरांनी खुप मेहनत घेतली.तसेच मुस्लिम ,मराठा , दलित.धनगर. रेड्डी,मातंग तसेच अन्य सर्व समाजांनी व या बरोबरच इतर पक्षातील समाज प्रेमी लिंगायत बांधवांनी सहकार्य केले . त्यामुळे आज लिंगायत समाजाला व कांग्रेस पक्षाला यश आले आहे.त्याबद्दल लिंगायत महासंघाच्या वतीने आपणा सर्वांचे आभार मानतो.व लातूर लातूर लोकसभा मतदारसंघ निवडणुकित प्रचंड मतांनी विजयी झाल्याबद्दल डॉ शिवाजी काळगे यांचं मनापासून हार्दिक अभिनंदन करतो.या पुढे ही लिंगायत समाजाला सन्मान मिळाला तर समाज पक्षाच्या बरोबर राहिलं अशी भावना लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार यांनी व्यक्त केली आहे.

## जाहीर प्रगटन

या प्रगटनाद्वारे जाहीर करतो की माझ्या मुलीच्या पासपोर्ट वर माझे नाव MOHAMMAD SAMEEMUDDIN असे असून इतर जन्म दाखला आणि आधारकार्ड व माझ्या इतर कागदोपत्रीवर माझे नाव MOHAMMED SAMEEMUDDIN असे आहे तरी पुढील सर्व व्यवहारात हेच नवीन नाव MOHAMMED SAMEEMUDDIN घेईन संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

**OLD NAME**
MOHAMMAD SAMEEMUDDIN
**NEW NAME**
MOHAMMED SAMEEMUDDIN
**ADDRESS**
Khori Galli, Madina Masjid Nagar Behind Panchayat Samiti Office, Mitra Nagar, Latur (M.S.) 413512

# येरोळ येथे फटाके फोडून आनंद साजरा



शिरूरआनंतपाळ : लातुर लोकसभा मतदार संघात कॉग्रेसचे उमेदवार डा. शिवाजीराव काळगे हे बहुमताने निवडुन आल्याबदल शिरूरआनंतपाळ शहरासह तालुक्यात सर्वात मोठे गाव असलेल्या येरोळ येथील चौकामध्ये फटाके फोडून व एकमेकाला गुलाल लाऊन पेढे भरऊन निकालाचा जल्लोस साजरा करण्यात आला.

यावेळी नवाझ पठाण, अंकुश लोंढे, आशोक चोंचडे, तानाजी महाराज दाडगे, जहरुद्दीन शेख, ओमप्रकाश तांबोळकर, उध्दव वाघमारे, पुंडलिक म्हाके यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.


दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचलित

## दयानंद विधि महाविद्यालय, लातूर

स्थापना-१९७१

शै. वर्ष २०२४-२०२५ साठी खालील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश देणे चालू आहे.

| | |
|---|---|
| **०१. अभ्यासक्रमाचे नाव** | :डी.टी.एल. (DTL) (डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ)<br>(डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ)<br>:ए.डी.आर. (ADR)<br>(डिप्लोमा इन अल्टरनेटीव्ह डिस्प्युट रिजोल्युशन)<br>:आई.पी.आर.(IPR)<br>(डिप्लोमा इन इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी राईट्स) |
| **२. अभ्यासक्रमाचा कालावधी** | :एक वर्ष |
| **३. शैक्षणिक पात्रता** | कोणत्याही शाखेचा पदवीधर |

अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहितीसाठी महाविद्यालयाच्या कार्यालयात ९.३० ते ५.०० या वेळेत संपर्क साधावा.

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये:**

०१. अनुभवी प्राध्यापक वर्ग, भव्य इमारत, सुसज्ज ग्रंथालय, गुणवत्तेची परंपरा कायम
०२. विविध स्पर्धा परिक्षांसाठी (JMFC, MPSC, UPSC इ.) प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध
०३. विविध स्पर्धा परिक्षांमध्ये (JMFC, MPSC, UPSC इ.) महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची यशाची परंपरा कायम.

**डॉ.पी.पी.नाथानी** प्राचार्य दयानंद विधि महाविद्यालय, लातूर
**रमेश बियाणी** सचिव दयानंद शिक्षण संस्था, लातूर
**रमेश बियाणी** अध्यक्ष दयानंद शिक्षण संस्था, लातूर



## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88



## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

यशवंत
धाराशिव जिल्हा
बुधवार दि. ०५ जून २०२४
३
☎कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## रोटरी क्लब उस्मानाबाद कडून खेळाडू योगिनी साळुंके सत्कार

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – तालुक्यातील अळणी येथील खेळाडू कु. योगिनी साळुंके हिची चीन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पेंटॅथलॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निवड झालेली आहे. तिला सदरील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रोटरी क्लब उस्मानाबाद व रोटरी सेवा ट्रस्टच्या वतीने सत्कार करून अर्थसहाय्य देण्यात आले. जे. एफ. अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालय धाराशिव येथे दिनांक २९ में २०२४ रोजी बुधवारी कु. योगिनी साळुंके हिचा सत्कार करण्यात आला व रोटरी क्लबच्या अध्यक्षा डॉ. अनार रवींद्र साळुंके व सचिव डॉ. मीना श्रीराम जिंतूरकर, यांच्या हस्ते नीधी प्रदान करण्यात आला. या वेळी रोटरी क्लब उस्मानाबादचे २०२४-२५ चे नियोजित अध्यक्ष डॉ. श्रीराम जिंतूरकर, सचिव आनंद कुलकर्णी आदी उपस्थित होते.



# खा. राजेनिंबाळकर यांनी सलग दुसऱ्यांदा उधळला विजयी गुलाल

## दिवसभर आतषबाजीने परिसर दणाणला

## एकनिष्ठपणा व जनतेचा संपर्क आला कामी

## नोटाला ३ हजार ८२२ मतदारांची पसंती

अर्चनाताई पाटील पहिली फेरी १६४१३, दुसरी फेरी ३३७०१, तिसरी फेरी ५१६५०, चौथी फेरी ६६९००, पाचवी फेरी ८४६४७, सहावी फेरी १०१०१०, सातवी फेरी ११७४४९, आठवी फेरी १३४३४०, नववी फेरी १५१३५०, दहावी फेरी १६७०८२, अकरावी फेरी १८४६९८, बारावी फेरी २०२१०१, तेरावी फेरी २१८७९९, चौदावी फेरी २३४६८१, पंधरावी फेरी २५००६७, सोळावी फेरी २६६५८२, सतरावी फेरी २८३५०२, अठरावी फेरी २९८७९५, एक्कोणीसवी फेरी ३१४८०७, वीसवी फेरी ३३०४३३, एकवीसवी फेरी २६८०२५, बावीसवी फेरी २७७७७६, तेवीसवी फेरी –२८८३४८, चोवसवी फेरी



**ओमप्रकाश राजेनिंबाळकर पहिली फेरी २८९७९, दुसरी फेरी ६०१७०, तिसरी फेरी ८९४८६, चौथी फेरी १२०५७७, पाचवी फेरी १४७८०३, सहावी फेरी १७८३३०, सातवी फेरी २०५१६३, आठवी फेरी २३४६१, नववी फेरी २६३७१८, दहावी फेरी २९३८३७, अकरावी फेरी ३२४८११, बारावी फेरी ३५३८७०, तेरावी फेरी ३८४०३५, चौदावी फेरी ४१४०८३, पंधरावी फेरी ४४३६३५, सोळावी फेरी ४७१९७४, सतरावी फेरी ५००८५१, अठरावी फेरी ५३२८७७, एक्कोणीसवी फेरी ५६०६१७, वीसवी फेरी ५८७५०४, एकवीसवी फेरी**



## पाटील घराण्याचा सलग तिसऱ्यांदा पराभव !

पाटील घराण्याची या जिल्ह्यावर गेल्या ४० वर्षापासून सत्ता आहे. मात्र २०१४ पासून त्यांच्या सत्तेला सुरू लागला असून माजी खासदार तथा राज्याचे माजी गृहमंत्री डॉ पदमसिंह पाटील यांचा शिवसेनेचे माजी खासदार प्रा रवींद्र गायकवाड यांनी २०१४ साली यांचा २ लाख ३४ हजार ३२५ मतांनी पराभव केला होता. तर त्यांचे पुत्र आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा २०१९ साली खासदार ओमराजे निंबाळकर यांनी १ लाख २६ हजार ८५८ मतांनी पराभव केला होता. तसेच या निवडणुकीमध्ये डॉ पद्मसिंह पाटील यांची सून व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांच्या ३ लाख २६ हजारांपेक्षा जास्त मताधिक्याने पराभव केला आहे. त्यामुळे पाटील घराण्याचा सलग तिसऱ्यांदा पराभव झाला असून त्यांच्या राजकीय कारकिर्दीला जबरदस्त धक्का लागला आहे.

## खा.राजेनिंबाळकरांचे पहिल्या फेरीपासून वाढते मताधिक्य

**फेरी १ ते ३० वाढ समावेश करीत वाढलेले मताधिक्य चढत्या क्रमाने अनुक्रमे १२५६६, २६४६९, ३७८३६, ५३६७७, ६३१५६, ७७३२०, ८७७१४, ९९७२१, ११२३६८, १२६७५५, १४०११३, १५१७६९, १६५२३६, १७९४०२, १९३५६८, २०५३९२, २१७३४९, २३४०८२, २४५८१०, २५७०७१, २६६८२९, २७५५२१, २८४०९१, २८९१०९, २८२९७१, २८५०२६, २८८८८८**

## उस्मानाबाद लोकसभा
## मतदारसंघातील आजवरचे खासदार

१९५२ राघवेंद्र दिवाण (काँग्रेस), १९५७ व्यंकटराव नळदुर्गकर (काँग्रेस), १९६२ तुळशीराम पाटील (काँग्रेस), १९६७ तुळशीराम पाटील (काँग्रेस), १९७१ तुळशीराम पाटील (काँग्रेस), १९७७ तुकाराम श्रृंगारे (काँग्रेस), १९८० मारोतीराव सावंत (काँग्रेस), १९८४ अरविंद कांबळे (काँग्रेस), १९८९ अरविंद कांबळे (काँग्रेस), १९९१ अरविंद कांबळे (काँग्रेस), १९९६ शिवाजी कांबळे (शिवसेना), १९९८ अरविंद कांबळे (काँग्रेस), १९९९ शिवाजी कांबळे (शिवसेना), २००४ कल्पना नरहिरे (शिवसेना), २००९ डॉ. पद्मसिंह पाटील (राष्ट्रवादी), २०१४ प्रा. रवींद्र गायकवाड (शिवसेना), २०१९ ओमप्रकाश राजेनिंबाळकर (शिवसेना)








**उस्मानाबाद लोकसभा मतदार संघातून २३ व्या फेरी अखेर मते पडलेले उमेदवार पुढीलप्रमाणे - बहुजन समाज पार्टीचे संजयकुमार भागवत वाघमारे (चिन्ह-हत्ती - ५०६७), आर्यनराजे किसनराव शिंदे (राष्ट्रीय समाज दल (आर) चिन्ह-अंगठी - १७१३), वंचित बहुजन आघाडीचे भाऊसाहेब रावसाहेब आंधळकर (चिन्ह-प्रेशर कुकर - २९०५१), नेताजी नागनाथ गोरे, देश जनहित पार्टी (चिन्ह-शिट्टी - २११८), नवनाथ विश्वनाथ दुधाळ, पक्ष-विश्व शक्ती पार्टी (चिन्ह-काडेपेटी - १०४९), नितेश शिवाजी पवार,पक्ष-हिंदराष्ट्र संघ (चिन्ह-वाळूचे घड्याळ - ९८१), ऍड.विश्वजीत विजयकुमार शिंदे, पक्ष-आदर्श संग्राम पार्टी (चिन्ह-बॅट - ७४८), शामराव हरीभाऊ पवार, पक्ष-समनक जनता पार्टी (चिन्ह-जहाज - १३४९), शेख नौशाद इकबाल, पक्ष-स्वराज्य शक्ती सेना (चिन्ह-हिरा - १५३७), सिध्दीक इब्राहीम बौडीवाले उर्फ गोलाभाई, पक्ष-ऑल इंडिया मजलीस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (चिन्ह-पतंग - १८०६), ज्ञानेश्वर नागनाथराव कोळी, पक्ष-समता पार्टी (चिन्ह-बॅटरी टॉर्च - ५८९६), अर्जुन सलगर, अपक्ष (चिन्ह-बुध्दीबळ पट १७५३), उमाजी पांडूरंग गायकवाड, अपक्ष (चिन्ह-टेबल - २८०७), काका फुलचंद कांबळे, अपक्ष (चिन्ह-मोत्यांचा हार ४३८३), काकासाहेब संदिपान खोत, अपक्ष (चिन्ह-भेंडी ५२४५), गोवर्धन सुब्राव निंबाळकर, अपक्ष (चिन्ह-चिमणी - १७३२१), नवनाथ दशरथ उपळेकर, अपक्ष (चिन्ह-ऑटोरिक्शा - १९५५), नितीन नागनाथ गायकवाड,अपक्ष (चिन्ह-कपाट ६८७), ऑड.भाऊसाहेब अनिल बेलुरे, अपक्ष (चिन्ह-भेटवस्तू - ६२७), नितीन खंडू भोरे, अपक्ष (चिन्ह-गॅस सिलेंडर - १०९५), मनोहर आनंदराव पाटील, अपक्ष (चिन्ह-शिवणयंत्र ११०४), योगीराज आनंता तांबे, अपक्ष (चिन्ह-तुतारी - ११९४), राजकुमार साहेबराव पाटील, अपक्ष (चिन्ह-पेट्रोलपंप ५५१), राम हनुमंत शेंडगे, अपक्ष (चिन्ह-फुलकोबी - २९६४), विलास भागवत घाडगे, अपक्ष (चिन्ह-सितार - ५५५), शायनी नवनाथ जाधव, अपक्ष (चिन्ह-रोड रोलर - ७२८), समीरसिंह रमेशचंद्र साळवी अपक्ष (चिन्ह-पाण्याची टाकी ५४७), सोमनाथ नानासाहेब कांबळे अपक्ष (चिन्ह-किटली - ११७४) व हनुमंत लक्ष्मण बोंदर अपक्ष (चिन्ह-विजेचा खांब १९६१) या उमेदवारांसह नोटाचा - ३८२२ मतांचा समावेश आहे.**

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभेसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या विरुद्ध महायुतीच्या अर्चनाताई पाटील यांना मोठ्या धक्कादायक पराभवाला सामोरे जावे लागले आहे. महायुती व महाविकास आघाडीने ही जागा अत्यंत प्रतिष्ठेची केली होती. अर्ज भरण्यासाठी राष्ट्रवादीचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देखील उपस्थित राहिले होते. तर खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतरांनी भव्य व जंगी सभा घेत संपूर्ण मतदार संघात प्रचार यंत्रणा प्रभावीपणे कामाला लावली होती. तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे प्रमुख खासदार शरद पवार यांनी देखील सभा घेत मुक्काम ठोकून यंत्रणा कार्यान्वित केली होती. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. महायुतीने ही जागा अत्यंत प्रतिष्ठेची केल्यामुळे निवडणूक अत्यंत चुरशीची होईल असे वातावरण निर्माण केले होते. मात्र मतदाराच्या मनात वेगळेच असल्यामुळे ही निवडणूक चुरशीची तर दूरच ईव्हीएम मशीनमधून पहिल्या फेरीपासून खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची सर्वच मतदान केंद्रावर मतदारांनी भरभरून झोळी भरल्याचे मत मोजणीतून दिसून आले. त्यामुळे खा राजेनिंबाळकर यांनी स्वतःचाच म्हणजे २०१९ मधील १२६८५८ मतांचा विक्रम मोडीत काढून जवळपास ३ लाख २६ हजार मतांनी विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे यापूर्वी आमदार राणाजगजिसिंह पाटील यांना पराभवाची धूळ चारली होती. तर आता आ पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना मोठ्या मताधिक्याने पराभूत करून सलग दुसऱ्यांदा संसदेत धडक मारली आहे. उस्मानाबाद मतदार संघाच्या निवडणुकीच्या मत मोजणीस धाराशिव शहरातील शासकीय तंत्रनिकेतन येथे सकाळी ८.३० वाजल्यापासून सुरुवात झाली. पहिल्या फेरीतच खा. राजेनिंबाळकर यांनी अर्चनाताई पाटील यांच्यावर १२ हजार ५६६ मतांनी आघाडी घेतली ती शेवटच्या मत फेरीपर्यंत वाढतच राहीली हे या विजयाचे विशेष म्हणावे लागेल. निवडणुक जाहीर होण्यापूर्वीच शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मतदार संघांमध्ये ५ सभा घेतल्या होत्या. तर राष्ट्रवादीचे प्रमुख खासदार शरद पवार तसेच शेवटच्या दिवशी उध्दव ठाकरे यांनी सभा घेप्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस, मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांच्या प्रचार सभा घेतल्या होत्या.



**या निवडणुकीत पवनराजे हत्याकांड, तेरणा ट्रस्ट , मेडीकल कॉलेज, तेरणा कारखाना, बंद पडलेले जिल्ह्यातील कारखाने, खासदार असून जिल्ह्याच्या विकासासाठी निधी आणला का ? धाराशिव - तुळजापूर - सोलापूर रेल्वे, पाटील परिवाराची ४० वर्षाची सत्ता, कायम दुष्काळी स्थिती, मराठवाडा कृष्णा सिंचन प्रकल्पाचे २१ टीएमसी पाणी, आंकाक्षित जिल्हा, सुवर्ण संपन्न उमेदवार, निष्ठावान खुद्दार, पक्ष फोडाफोडी, जनतेचे फोन उचलून त्यांना मदत करणे, सत्ताधाऱ्यांकडे मंत्री, सहा आमदार तर माझ्याकडे सर्वसामान्य जनता या मुद्द्यावर खा. राजेनिंबाळकर आदी मुद्यांवर प्रचारात राळ उडवून दिली होती.**

**२०१९ च्या निवडणुकीतील मतापेक्षा एक तरी मत जास्त घेईन असे आव्हान खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी विरोधकांना दिले होते. तसेच १९ ला मोदींच्या कृपेमुळेच निवडून आले असे विरोधक हिणवत होते. त्यांना देखील मी मोदीच्या नाहीतर शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे व जनतेच्या आशिर्वादाने आलो असल्याचे सांगितले. मात्र विरोधकांनी या निवडणुकीत निवडून या असे प्रति आव्हान दिले होते. या निवडणुकीत खासदार राजेनिंबाळकर यांनी या निवडणुकीत मोदीची नव्हे तर एक निष्ठा प्रामाणिकतेची व जनतेच्या केलेल्या कामाच्या जीवावर निवडून आल्याचे दाखवून दिले असल्याचे त्यांनी सांगितले.**

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
| --- | --- |
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.


यशवंत
बुधवार दि. ५ जून २०२४
उदगीर
पान ४
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
| --- | --- | --- |
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा विजय

## उदगीरात जल्लोष







**उदगीर (प्रतिनिधी)** लातूर लोकसभा मतदार संघातुन काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे बहुमताने विजयी झाल्याबद्दल काँग्रेस महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.

काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे ६१८८१ एवढया मोठया मताधिक्याने विजयी झाले आहेत. या निवडणुकीत एकुण २८ उमेदवार उभे होते. त्यात काँग्रेस महाविकास आघाडीचे डॉ. शिवाजी बंडेप्पा काळगे तर भाजपा महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांच्यात अटीतटीची निवडणुक झाली. डॉ. शिवाजी काळगे यांना सहा लाख नउ हजार एकेविस तर सुधाकर श्रृंगारे यांना पाच लाख सत्तेचाळीस हजार एकशे चाळीस तर तिसरे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार नरसिंग उदगीरकर यांना बेचाळीस हजार दोनशे पंचेवीस एवढे मते मिळाली. या निवडणुकीचे निकालाची उत्सुकता सकाळी ८ वाजल्यापासुनच जनतेला लागुन राहीली होती. काही तालुक्यात अफवा वगळता प्रत्येक फेरीत काँग्रेस आघाडीचे डॉ. शिवाजीराव काळगे यांना मताधिक्य वाढत गेले. डॉ. शिवाजी काळगे यांच्या विजयाने काँग्रेस महाविकास आघाडीतील घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन गुलालाची उधळण करत, फटाक्याची अतिषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उदध्व बाळासाहेब ठाकरे गट), राष्ट्रीय दलित अधिकार मंच चे पदाधिकारी, नेते सह कृषि उत्पन्न बाजार समितिचे सभापति शिवाजी हुडे, उपसभापती प्रीति भोसले, अॅड. पद्माकर उगीले, शीलाताई पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राष्ट्र वादीचे चंदन पाटील नागराळकर, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शिवाजी मुळे, शहर कार्याध्यक्ष गजानन सताळकर, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, शिवसेना(ठाकरे गट) चंद्रकांत टेंगेटोल, श्रीमंत सोनाळे, राष्ट्रीय दलित अधिकार मंचचे प्रदेश अध्यक्ष निवृत्ती सांगवे, विजयकुमार स्वामी, शिवशंकर मठपती, शिवराज जोमदे, यशवंत बिरादार, ललिता झिल्ले, सौ. ज्योती डोळे, चारुशिला पाटील शिवाजी लकवाले, सचिन साबने, सरोजा बिरादार, दत्ता खंकरे, बालाजी पाटील नेत्रगावकर, प्रा. एस.एस.पाटील, अंकुश कोनाळे, अजय शेटकार, प्रितम गोखले, मनोहर बिरादार, बबन धनबा, शांतवीर स्वामी बटनपुरकर यांच्यासह आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## माऊली ग्रुपच्या वतीने महाआरती



काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या विजयासाठी येथील माऊली ग्रुपच्या वतीने मंगळवार दि. ०४ जुन रोजी सकाळी ६ वाजता कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे यांच्या हस्ते आडत बाजार येथील श्रीगणेशाची महाआरती व कुमारस्वामी मंदिर येथे महाआरती करण्यात आली. यावेळी माऊली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे, उपाध्यक्ष मनोहर पांचाळ, सचिव मनोज शिवनखेडे, मार्गदर्शक विलास बोके, कुमार चौधरी, शिवशंकर मठपती, भारत कोयले, शिवशंकर जिवणे, अॅड. कपिल बिरादार, संजय दुनगे, सुनिल पाटील, विजय कळसे, संतोष काळेकर, शिवलिंग मठपती, विजयकुमार सजनशेट्टे, मन्मथ मुळे, शिवाजी चिल्ले यांच्यासह उध्दव महाराज हैबतपुरे, मल्लिकार्जुन स्वामी होकर्णेकर, बालाजी शेळके आदि उपस्थित होते.

काँग्रेस अघाडीचे उमेदवार शिवाजी काळगे यांचा विजय घोषित होताच उदगीर आडत बाजारात आडत व्यापारी असोसिएशनच्या वतीने फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला यावेळी काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करण्यासाठी बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे व संचालक मंडळाने विशेष प्रयत्न केले. त्याबद्दल सभापती शिवाजीराव हुडे व पंचायत समितीचे माजी सभापती प्रा. शिवाजी मुळे यांचा आडत व्यापारी असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आडत व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष श्रीधर बिरादार, मनोहर बिरादार, नागेश आंबेगावे, रविंद्र कोरे, शिवशंकर बिरादार, जगदिश बाहेती, साईनाथ कल्याणी, प्रमोद पाटील, शिवाजी पेठे, संजय बिरादार, उमाकांत पांढरे, दिलीप जाधव, श्याम बिरादार, मारोती कडेवार, भरत दंडिमे, घुमास्ता युनियनचे अध्यक्ष सुरेश लांडगे, बाळू गंगथडे, मदरगावे, प्रदिप कोठाळे, राहुल राठोड, सुरेश जाधव, अतुल देशमुख, राजु इंगळे, बबलु काळगापुरे, कल्लेश्वर संजय पाटील, मईनु पटेल, शामद शेख, बालाजी बिरादार, कोंडीबा बिरादार अदि उपस्थित होते.

## जाहीर प्रकटन

तमाम जनतेस व हितसंबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, संगम प्रकाश मुंगीलवार रा. उदगीर यांनी राम मानिक टिळे व लक्ष्मण माणिक टिळे यांचा उदगीर येथील जमीन सर्वे नं. ३३७ मधील प्लॉट/ घर नं ३७ ज्याचा नगर परिषद नं. ४/३/११७९ असा आहे. सदरील घराची चर्तुसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : प्लॉट नं. २३
पश्चिमेस : २० फुटाचा रस्ता
दक्षिणेस : प्लॉट नं. ३५
उत्तरेस : प्लॉट नं. ३३

वरील चर्तुःसिमेचे घर खरेदी घेण्याचा ठराव केला आहे. सदर मालमत्तेबाबत कोणाची तक्रार किंवा उजर, लिज,बोजा आक्षेप पोटगी हक्क न्यायालयीन वाद, जप्ती पुर्णतः निर्बेध्द निजोखमी व बोजारहीत नसल्याचा भरवसा दिला आहे. तरी या जाहीर प्रगटनाद्वारे हितसंबंधीतास सुचित करण्यात येते की, जर उपरोक्त पत्यावर ०८ दिवसांत लेखी आक्षेप पुराव्या सह पोच करावा अन्यथा सदर मिळकत ही निर्विवाद आहे असे समजुन व्यवहार पुर्ण करतील मुदतीनंतर आलेला आक्षेप आम्हास बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

जाहिर प्रगटण देणार

संगम प्रकाश मुंगीलवार
घर क्र. ६/१/२६५
मुक्कावार गल्ली, उदगीर
जि.लातूर मो.नं. ९४२१३६४३०१

# श्यामलाल हायस्कूल च्या मुख्याध्यापक पदी भारत खंदारे यांची नियुक्ती



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्यामलाल मेमोरियल हायस्कूलच्या मुख्याध्यापक पदी एक जून २०२४ पासून श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेच्या आदेशानुसार भारत खंदारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी मुख्याध्यापक बालाजी चव्हाण यांच्या सेवानिवृत्तीनंतर शालेय प्रशासन व्यवस्थित रित्या चालावे यासाठी संस्थेने श्यामलाल ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक भारत खंदारे यांची नियुक्ती मुख्याध्यापक व प्राचार्य पदी केलेली आहे त्यानिमित्ताने नवनियुक्त मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांचा पदग्रहण सोहळा व सत्कार समारंभ संपन्न झाला.

श्यामलाल हायस्कूलच्या पर्यवेक्षक पदी राहुल लिमये यांची निवड झाली आहे तर श्यामार्य कन्या विद्यालयाच्या पर्यवेक्षक पदी प्रवीण भोळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचा श्याम लाल स्मारक शिक्षण संस्था अंतर्गत सर्व आस्थापना मार्फत सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्कार सोहळ्यास संस्था प्रतिनिधी रमेश काकडे, श्यामलाल हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक बालाजी चव्हाण, श्यामार्य कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तृप्ती ज्ञाते, श्यामलाल प्राथमिक विद्यामंदिर चे मुख्याध्यापक विवेक उगिले, श्यामलाल सार्वजनिक वाचनालयाच्या प्रभारी रेखा लाला तसेच सर्व आस्थापनातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड. सुपोषपाणि आर्य, उपाध्यक्ष गिरीश मुंडकर, सचिव अॅड. विक्रम संकाये, सहसचिव अंजुमणी आर्य यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच प्रविण भोळे, नारायण कांबळे, माजी मुख्याध्यापक बालाजी चव्हाण यांनी नवनियुक्त मुख्याध्यापकास यशस्वी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनाचे कार्य उमाकांत सूर्यवंशी यांनी केले कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# पिंपरी येथे जागतिक दुग्ध दिन साजरा



**उदगीर (प्रतिनिधी)** जागतिक दुग्ध दिनानिमित्त महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या दूध जागरूकता अभियानाअंतर्गत आणि डॉ. नंदकुमार गायकवाड, सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली दूध जागरूकता कार्यक्रम पिंपरी ता. उदगीर येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये उन्नत भारत अभियानानंतर्गत दत्तक गाव पिंपरीचे नोडल अधिकारी डॉ. प्रफ्फुल्लकुमार पाटील आणि सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सौ. मत्स्यगंधा पाटील यांनी मानवी आहारात दुधाचे महत्व याबाबत उपस्थित मुलं व मुलींना मार्गदर्शन करून दररोज एक ग्लास दूध पिण्याचे आव्हान केले आणि उपस्थितांना दुधाचे वाटप केले. सर्व मुलांनी उत्स्फूर्तपणे या कार्यक्रमात सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. प्रफ्फुल्लकुमार पाटील. डॉ. सौ. मत्स्यगंधा पाटील, श्री. रत्नाकर बिरादार, सोमेश्वर बिरादार, श्री. प्रताप बिरादार आणि विद्यार्थिनी डॉ. श्वेता पपशेटवार व डॉ. माधुरी अटला यांनी विशेष कष्टघेतले.

## घर विकणे आहे

**शिवाजी महाविद्यालय/ विद्यावर्धिनी हायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम रामचंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८० ८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेल्या ३१ रुम विकणे आहे.**
**संपर्क ९८२३६३२३००, ९४२३३४७७५०, ९०९६४२४०४२**

# मुलाने कोयत्याने वार केल्याने आईचा मृत्यू

**उदगीर (प्रतिनिधी)** शहरातील बनशेळकी रस्त्यावरील क्रांतीनगर भागागील आरोपीने घराची वाटणी द्या असे म्हणून स्वतःच्या आई व भावाला कोयत्याने मारून गंभीर जखमी करीत त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला होता. यात गंभीर जखमी झालेल्या जन्मदात्या आईचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मुलाची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे.

याबाबत तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक भिसे यांनी दिलेल्या माहितीनुसार गुरुवारी (दि.३०) दुपारी तीन वाजेच्या सुमारास शहरातील बनशेळकी रोडवरील क्रांतीनगर भागातील राणी महलजवळ आरोपी सिध्दार्थ बाबासाहेब बनशेळकीकर (वय २६, रा. क्रांतीनगर बनशेळकी रोड, उदगीर) याने घराची वाटणी द्या, असे म्हणून घरात वाद घातला. हातातील कोयत्याने जिवे मारण्याच्या उद्देशाने आई संगीता बाबासाहेब बनशेळकीकर आणि भाऊ सचिन बाबासाहेब बनशेळकीकर यांच्या डोक्यात, पाठीत व शरीरावर ठिकठिकाणी मारुन गंभीर जखमी केले होते. जखमी आई व मुलावर उपचार सुरू होते. परंतु, उपचारादरम्यान गंभीरसा जखमी असलेल्या संगीता बाबासाहेब बनशेळकीकर (वय ४७) यांचा रविवारी (दि.२) पहाटेच्या सुमारास उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे, असे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक भिसे यांनी सांगितले. आरोपी सिध्दार्थ बनशेळकीकर याची दोन दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर तुरुंगात रवानगी झाली आहे. तर सदर गुन्ह्या ३०२ चे कलम वाढ होईल, असे पोलीस उपनिरीक्षक भिसे यांनी सांगितले.